नि.फौज केस क्र. ३८१/२०२१
निशाणी क्र. ५०

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – सुभाष सदाशिव पवार
वय सुमारे - ५५ वर्षे व्यवसाय - शेती
राहणार – - शेलगांव आटोळ, चिखली ता. बुलढाणा
जिल्हा – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी क्र. १ ते ४ हजर आहे. मी आरोपी क्र. ५ ला पाहिल्यास ओळखू शकतो. घटना हि दि. ०५.०७.२०२१ रोजी रात्री १०.३० वा. माझ्या घरा जवळ घडली. त्यावेळी मी व माझा मुलगा सचिन अंगणात झोपलेलो होतो. त्यावेळी सर्व आरोपी तेथे आले व शेतीच्या जुन्या कारणावरुन आरोपींनी मला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आरोपी श्रीकृष्ण अंभोरे यांनी काठने माझ्या डाव्या बरकडीवर, डाव्या हातावर, मारहाण केली. माझा पुतण्या ज्ञानेश्वर लक्ष्मण पवार याला आरोपी अविनाश गुंड याने कोयता/सुरीने त्याचे डोक्यात मारले त्यामुळे त्याच्या डोक्यातून रक्त वाहत होते. माझा मुलगा सचिन याला आरोपी गणेश याने दगडाने आणि काठीने त्याच्या पाठीत व डोक्यात मारहाण केली त्यामुळे त्याला मुक्का मार लागला होता. त्यानंतर मी माझा पुतण्या याला जवंजाळ हॉस्पीटल चिखली येथे उपचारासाठी घेवून गेलो. त्यानंतर मी अंढेरा पो.स्टेशन येथे जावून तक्रार दिली. आता मला अभिलेखावरील रिपोर्ट दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ५१** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ५२** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझे बयाण नोंदवले होते. आरोपीने मला ज्या काठीने मारहाण केली होती ती काठी मी पाहिल्यास ओळखू शकतो. फिर्यादीला ओ.पी. क्र. ६४/२०२५ वरील काठी दाखवण्यात आली. आरोपीने त्याला ज्या काठीने मारले होते ही तीच काठी असल्याचे त्याने सांगीतले. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट ०१** देण्यात येत आहे. आता फिर्यादीस कोयता दाखवण्यात आला. आरोपीने फिर्यादीचे पुतण्याला ज्या कोयत्याने मारले होते हा तोच कोयता असल्याचे सांगीतले. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट ०२** देण्यात येत आहे. आता फिर्यादीस दगड दाखवण्यात आला. आरोपीने फिर्यादीचे मुलास ज्या दगडाने मारले होते हा तोच दगड असल्याचे सांगीतले. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट ०३** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. एस.बी. जाधव  यांचेतर्फे</u>**

०२. मी शाळा शिकलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी श्रीकृष्ण अंभोरे व ज्ञानेश्वर अंभोरे यांचे सोबत घटने पूर्वी पासून आमच्यामध्ये पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जमीनाचा वाद हा ज्ञानेश्वर अंभोरे आणि माझा भाऊ व माझ्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला वाचता येत नसल्यामुळे रिपोर्टमध्ये काय मजकूर लिहिलेला आहे मला माहित नाही. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, घटना हि दि.०५.०९.२०२१ ची आहे. त्यावेळी मी व माझा मुलगा घरासमोर अंगणात झोपलो होतो. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्ट व बयाणात पोलीसांनी का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांनी रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, शेतीच्या वादावरुन आमच्या घरी हल्ला केला व सर्व आरोपींनी मला शिवीगाळ केली. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्ट व बयाणात पोलीसांनी का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, आरोपी अविनाश गुंड याने कोयत्याने ज्ञानेश्वर याला मारले, तसेच गणेशने सचिनला पाठीत व डोक्यात काठीने व दगडाने मारहाण केली. सदरचा मजकूर माझ्या रिपोर्ट व बयाणात पोलीसांनी का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

०३. पोलीसांनी माझे बयाण दि.२०.०७.२०२१ रोजी घेतले होते. पोलीसांनी माझे बयाण पोलीस स्टेशन येथे घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, माझा पुतण्या व मुलाला मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी श्रीकृष्ण अंभोरे याने माझ्या डाव्या बरगडीवर, हातावर व बोटावर मारहाण केले हे मी खोटे सांगत आहे. अविनाश गुंड हे चिखलीचे राहणारे आहे. हे म्हणणे खरे नाही की, अविनाश गुंड याने ज्ञानेश्वर याला डोक्यात कोयत्याने मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्याला डोक्यात मार लागला व डोक्यातून रक्त निघाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सचिनला आरोपी गणेशने काठीने व दगडाने पाठीत व डोक्यात मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो तशी कुठली घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा मुलगा अंगणात झोपलो होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि आमच्या मध्ये शेतीचा वाद असल्यामुळे आम्ही एकमेकावर बरेच केसेस दाखल केले आहे. आमच्या चार ते पाच केसेस एकमेकाविरुध्द न्यायालयात प्रलंबीत आहे.  तसेच

दिवाणी दावा देखील प्रलंबीत आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानेश्वर दारात पडल्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागला. हे म्हणणे खरे आहे की, मटेरियल ऑब्जेट ०१ वर काठया या शेतामध्ये मिळून येतात. हे म्हणणे खरे आहे की, कोणता आरोपी कोणती काठी घेवून होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोर दगड पडलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, सुरी ही मार्केट मध्ये सहज उपलब्ध होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना काठी दगड आणि सुरी दिली. हे म्हणणे खरे नाही की, अंधार असल्यामुळे कोण आरोपी होते हे मला दिसले नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेतीच्या कारणावरुन मी आरोपी विरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या असे म्हणणे आहे की, आरोपी यांनी त्याची शेती माझे नावे करुन द्यावी. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून मी आरोपी विरुध्द खोटी केस दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने देखील घटनेच्या दिवशी माझ्या विरुध्द रिपोर्ट दिला होता.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.11.29 16:25:34 +0530

( श्रीमती एस.एच. उके )

दि. २०.११.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.